# CURRENT GLOBAL REVIEWER

Half Yearly | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue X Vol IV, Jan. 2020 | Sr. No. 64310 | Impact Factor :7.139


# Current Global Reviewer

UGC Approved International Research
Refereed Multidiciplanary Journal


Editor In Chief
Mr. Arun B. Godam

ISSUE X, Volume IV(Half Yearly)
Published on April. 2020



**Editorial Office Address :**

Khadgaon Road, Kapil Nagar, Latur,
Dist. Latur 413512 (M.S.) India

Contact- 8149668999

Email-
hitechresearch11@gmail.com



Publisher
**Shaury Publication**
Kapil Nagar, Latur
Contact- 8149668999

Rs. 400/-



## EXECUTIVE EDITORS

**Dr. ChittaRanjan Panda**
P.G. Deptt. Of Odia
Shailabala Women's Autonomous
College, Cuttack - (Orissa)

**B.J. Hirve**
Dept. of Botany
VasantMahavidyalaya,
Kaij Dist. Beed (M.S.)

**Dr. U.T. Gaikwad**
Dept. of Geography,
Smt. S. D. M. College
Latur, Dist. Latur (M.S.)

**Dr. PravinDiddeshwarShete**
Dept. of Zoology, Maharashtra
UdaygiriMahavidyalaya, Udgir,
Dist. Latur

**MaimanaJahanAra**
Head, Dept of Political Science,
Sir Sayyed College,
Aurangabad, Dist. Aurangabad

**Dr.U.V.Panchal**
H.O.D. Dept of Commerce,
Deogiri College,
Aurangabad, Dist. Aurangabad

**Dr M.U. Yusuf**
Dept of Commerce,
Sir Sayyed College,
Aurangabad, Dist. Aurangabad

**Pro. S.B. Karande**
Dept. of Economics,
ShriBhausahebVartak College,
Borivali (W), Dist. Mumbai

**Dr. Hanumant Mane**
R.Guide& Head,
Dept. of Marathi,
Shivchatrapati College,
Kalam, Dist. Osmanabad(M.S.)

**Dr. SachinKadam**
Dept. of Hindi
Nagarpalika Art D.J. Malpani Comm.
& B.N. Sarda Sci. College,
Sangmner, Dist. Ahmadnagar (M.S.)


*www.rjournals.co.in*

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Half Yearly
Issue X Vol IV, Jan. 2020 | UGC Approved Sr. No. 64310 | ISSN : 2319 - 8648 Impact Factor :7.139

# Index


| Sr. No. | Article Title | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Regular Exercise: A Need of Time | Dr.Nirajkumar N. Uplanchwar | 1 |
| 2 | Study The Problems Of Marginalized Groups And Role Of The Organizations To Cope Up With Hiv (With special reference to NACO – NACP Phase) | Dr. Girija Ranasing<br>Manju Thakur<br>Dr.BabasahebKokate | 4 |
| 3 | खरगोन जिलेमें लाल मिर्चव्यवसाय में कार्यशील पूंजी काविश्लेषणात्मक अध्ययन | विष्णुप्रसाद बैसवार<br>डॉ दिनेष अग्रवाल | 8 |
| 4 | स्त्री सबलीकरण काळाची गरज | डॉ.एस.पी. गायकवाड | 12 |
| 5 | पेशवेकालीन न्यायमुर्ती राम शास्त्री प्रभुने | डॉ. एन. जी. भद्रे | 16 |
| 6 | आरसीटी साधनसामुग्री आर्टस् ,कॉमर्स आणिसायन्स कॉलेज कराड आणि पाटण तालुका: एक अभ्यास | प्रा. अनिल शिवाजीपाटील | 19 |
| 7 | स्वातंत्र्याचा जाहिरनामा : केसरीसुत | डॉ. बालाजी मा. गव्हाळे | 31 |
| 8 | साहित्यरत्न अण्णाभाऊसाठे यांचेकादंबरीलेखन | प्रा.डॉ.नारायण शिवशेट्टे | 35 |
| 9 | असंगघोषके 'बंजर धरती के बीज'में अभिव्यक्त दलित संवेदना | डॉ. जयंत बोबडे | 39 |
| 10 | प्राचीन कालखंडातील स्त्रिया व त्यांचा दर्जा एक मंथन | प्रा.डॉ. जाधवर बापू देवराव | 45 |

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Half Yearly
Issue X Vol IV, Jan. 2020 | UGC Approved Sr. No. 64310 | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 2.143

# प्राचीन कालखंडातील स्त्रिया व त्यांचा दर्जा एक मंथन

प्रा.डॉ. जाधवर बापू देवराव
(इतिहास विभाग प्रमुख), बलभीम महाविद्यालय, बीड

**प्रस्तावना :-**

जगाच्या देशाच्या व राज्याच्या इतिहासात प्राचीन कालखंडात समाजातील स्त्रिया, पुरुष या शिवाय इतर काही महत्वाचे घटक आहेत. त्या घटकांचा किंवा व्यक्तींच्या अधिकाराचे पूर्वीचे ऐतिहासिक पैलू पडताळायचे असतील तर त्यासाठी काही ऐतिहासिक साधनांचा आधार घ्यावा लागतो. तो आधार म्हणून काही वैदिक साहित्य म्हणजे मॅक्सम्युलरच्या मते (वेदांना) आर्यांचे बायबल असे मॅक्समूलर म्हणतो ते वैदिक साहित्य याशिवाय महाकाव्ये पुराणे, तसेच बौध्द आणि जैन धर्मांचे साहित्य मंदिर, लेण्या, मूर्ती, परकियांची प्रवासवर्णने, पुरातत्वीय साधने अशा वरील विविध साधनांच्या आधारे प्राचीन इतिहासातील घटनांची पडताळणी करावी लागते. वरील साधनांच्या आधारे प्राचीन काळातील घटनांवर जे मंथन होईल ते खऱ्या अर्थाने अभ्यासपूर्ण असणार आहे. अशा घटना व व्यक्तींपैकी आपणास प्राचीन कालखंडातील स्त्रिया व त्यांचा दर्जा याविषयी या शोधनिबंधात काही गोष्टी नोंदवणे आवश्यक आहे.

प्राचीन काळात भारतात असो किंवा जगामध्ये असो समाज हा टोळी समाज म्हणून वास्तव्यास होता. तत्कालीन समाजाची स्थिती जेव्हा भटकंतीची होती त्या काळात मानवाच्या उपजिविकेसाठी आवश्यक असणारे अन्न गोळा करण्याचे महत्वाचे काम तत्कालीन स्त्रिया-पुरुष एकत्रपणे करत असत. प्राचीन काळात समाजाचे वास्तव्य हे टोळीच्या स्वरुपात असल्याने असे म्हटले जाते की, शेतीचा शोध सुध्दा खऱ्या अर्थाने स्त्रियांनीच लावला. कारण जमिनीत असलेली कंदमुळे बाहेर काढणे झाडाला लागलेली फळे तोडणे, शेतीची मशागत करणे, धान्याचे साठे करणे, दुग्ध व्यवसाय, पशुपालन या गोष्टी विकसित करण्यात स्त्रियांचा मोठा सहभाग होता. तरी पण पितृसत्ताक कुटुंब पध्दती अस्तित्वात आणून मूलसत्ता अर्थसत्ता या दोन गोष्टी स्त्रियांच्या हातून घेऊन पुरुषी वर्चस्व त्यावर प्रस्थापित झाले. पुढे कुटुंब प्रमुखाने स्त्रिया व मुले यांच्यावर स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित करून आपले अस्तित्व दाखवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे स्त्रियांचा दर्जा घसरत गेला आणि याच गोष्टी भारतात सुध्दा घडून आल्या हे आपणास मान्य करावे लागेल.

जगामध्ये अनेक वेगवेगळ्या संस्कृती अस्तित्वात आहेत. त्या संस्कृतीचा दर्जा ठरवायचा असेल तर त्या संस्कृतीमधील स्त्रिजिवन कसे आहे हे पहाणे गरजेचे आहे. मग अनेक गोष्टींवरून स्त्रियांचा दर्जा ठरत असतो. त्यामुळे प्राचीन काळात स्त्रियांचा दर्जा कसा होता हे खालील बाबींवरून स्पष्ट होते.

**मुलीच्या जन्माने असमाधान** – प्राचीन कालखंडातील कुटुंब पध्दतीचा विचार केला तर आपणास पितृसत्ताक कुटुंब पध्दती अस्तित्वात असल्याचे अनेक पुरावे देता येतात. त्यामुळे कुटुंबामध्ये मुलांच्या जन्माचे मोठे स्वागत केले जात असे तर मुलीच्या जन्माविषयी कुटुंबात अनुत्सुकता असल्याचे दिसून येत असे. कारण मुलगा हा कुटुंबाचे नाव पुढे चालू ठेवतो तसेच धार्मिक विधी पार पाडतो. याशिवाय कुटुंबाचे रक्षण आणि पालनपोषण करतो. असा तत्कालीन समज होता. याशिवाय त्याकाळातील सत्ता स्पर्धेच्या वातावरणामुळे मुलांच्या जन्माचे स्वागत तर मुलीच्या जन्माविषयी कुटुंबामध्ये आनंद साजरा केला जात नसे. एकंदर या उदासिनतेमुळे वैदिक कालखंडात स्त्रियावर अनेक बंधने टाकली. या सर्व गोष्टींना स्त्रीचा जन्म हेच कारण समाजात रूजले गेले. त्याकाळात मुलीच्या जन्मासाठी कोणत्याही प्रकारची प्रतिज्ञा केल्याचे सुक्त दंतकथेत आढळून येत नाही.